IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN 2455-4375

# जागतिक अलिप्ततावाद चळवळ आणि भारताची भुमिका

**प्रा. कु. पौर्णिमा एच. राहांगडाले**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
ईमेल— rahangdalep085@gmail.com
मो. नं.— 8055062556

.....................................................................................................................................................

**बीजशब्द :** अलिप्ततावाद, शीतयुध्द, जागतिक राजकारण, महाशक्ती, बलाढ्य संघटन, चळवळ, स्वातंत्र्य, शांतता, आंतरराष्ट्रीय, धोरण, भारत, संघर्ष.

**प्रस्तावना :** जगातील बलाढ्य महाशक्तिंच्या निरर्थक अहंकारामुळे व स्वार्थापायी जगात नेहमी युध्दे होत होती व त्यामुळे जागतिक अशांतता, अविकसीतता, गरीबी, भुकमरी व मानवांधिकारांचा ऱ्हास होत होता. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दानंतर जग दोन गटात विभागला गेला. एकीकडे भांडवलशाही व वसाहतवादी राष्ट्रे तर दुसरीकडे साम्यवादी. दुसऱ्या महायुध्दानंतर सोव्हियत संघ, पोलंड, हंगेरी, झेकोस्लोव्हाकीया, पूर्व जर्मनी आणि बल्गेरिया हि पुर्व युरोपीय राष्ट्रे तसेच आशियायी चीन मिळून एक साम्यवादी गट तयार झाला. तर साम्यवादाच्या प्रसारावर अंकुश ठेवण्यासाठी साम्यवादी राष्ट्रांभोवती लष्करी तळ निर्माण करण्याचे धोरण अमेरिकेने आखले आणि त्यातूनच उत्तर अटलांटिक करार संघटना (नाटो) ची स्थापना झाली. नाटो ला प्रत्युत्तर म्हणून साम्यवादी देशांनी वॉर्सा करार संघटनेची स्थापना केली. या दोन्ही संघटनेच्या प्रतीस्पर्धेमुळे आफ्रिका व आशिया खंडातील नवस्वतंत्र देश ज्यांनी युरोपीयांच्या वसाहतीवादा बरोबर स्वातंत्र्य लढा लढून स्वातंत्र्य मिळविले त्यांची गळचेपी होवू लागली. त्यांच्या अण्वस्त्र स्पर्धा व त्यांच्यातील शीत युध्दामुळे आपले स्वातंत्र्य, विकास, संस्कृती अबाधित ठेवण्यासाठी दोन्ही गुटांसी अलिप्त असे नविन गट स्थापन करण्याची त्यांना आवश्यकता भासू लागली. त्यातच दुसऱ्या महायुध्दानंतर अलिप्तवादी (गुटनिरपेक्ष— Nonalignment) संघटनेची स्थापना करण्यात आली. या गुटात प्रामुख्याने नवस्वात्ंत्र्य मिळविलेले आफ्रिकन व आशियन देश होते. (संदर्भ २ पान नं. २०१)

**अलिप्तता वाद :**

अलिप्तता हे एक स्वातंत्र धोरण आहे. नवस्वतंत्र्य देशांनी साम्राज्यवादी व मोठ्या महाशक्तिंच्या गुटबाजी पासून तटस्थ राहून स्वत:ची आर्थिक प्रगती, देशातील जनतेचा राहणीमान उंचावण्यासाठी व आपली संस्कृती व स्वातंत्र्य टिकविण्यासाठी गुट निरपेक्ष भुमिका घेतली होती. आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये कोणाचीही बाजू न घेणे व त्यांच्यातील वितुष्ट संपवून शांतीसाठी मोलाची सक्रीय भुमिका व प्रयत्न करने होते. आांतरराष्ट्रीय समस्यांबद्‌दल तटस्थ न राहता समस्यांच्या निराकरणासाठी सातत्याने सक्रीय निभावण्याचे उद्‌दिष्ट सुध्दा अलिप्ततावादी संघर्षाचे प्रमुख उद्‌दिष्ट होते.

**भारताचे परराष्ट्र धोरण व अलिप्ततावाद :**

स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरणाचे स्वरुप कसे असावे याबद्‌दल स्वातंत्र्यपूर्व काळात १९३६ च्या हरीपूर येथे कॉंग्रेसच्या अधिवेशनात महत्वपूर्ण ठराव मांडण्यात आला. या ठरावामधे स्वतंत्र्य भारत शेजारी राष्ट्रांशी व अन्य राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण शांततामय संबंध ठेवेल. चिरस्थायी आंतरराष्ट्रीय जागतिक शांततेसाठी साम्राज्यवाद, वसाहतवाद, भेदभाव शोषण थांबविणे अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन करण्यात आले.

जागतिक शांतता व स्वातंत्र्य या करिता सर्वच देशांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करुन परस्पर विरोधी आंतरराष्ट्रीय गुटबाजीपासून सावध व शक्यतो अलिप्त राहण्याची भारताने भुमिका घेतली होती. शांतता—रक्षण

हा भारताच्या धोरणाचा मध्यवर्ती उद्देश आहे आणि याच उद्देशाला अनुसरुन त्याने अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब केला आहे. अलिप्ततावाद म्हणजे क्रिया शुन्यता नसून आपल्या समोरील प्रश्नांबाबत कृतीशीलता असा भारताचा दृष्टिकोन आहे. त्याच्यानुसार प्रत्येक देशाला स्वातंत्र्याचा मुलभुत अधिकार आहे व स्वत:च धोरण आणि जीवन पध्दती स्वीकारणचाही त्याला अधिकार आहे. दुसऱ्या देशांच्या अंतर्गत बाबींत ढवळाढवळ न करणे तसेच अतिक्रमण न करणे, आंतरराष्ट्रीय सीमा रेखांचा मान राखणे, परस्पर सामंजस्य आणि शांततामय सहजीवन या तत्वांवर भारताच्या परराष्ट्र नीतीचा प्रमुख भाग आहे.

**अलिप्तवादात भारताची भुमिका :**

अलिप्ततावाद हा भारताच्या विदेश नितीचा मुळाधार आहे. भारत हा या आंदोलनाचा आद्य प्रवर्तक आहे. इजिप्त, युगोस्लाव्हिया, इंडोनेशिया आणि ब्रम्हदेश या प्रमुख राष्ट्रांच्या सक्रीय सहयोगामुळे या चळवळीची मुहूर्तमेढ भारताने रोवली. भारताचे प्रथम प्रधानमंत्री व ज्येष्ट स्वातंत्र्यसंग्राम सैनिक पं. जवाहरलाल नेहरु यांनी अलिप्ततावाद या संकल्पनेची प्रथमत: स्पष्ट व सुसंगत मांडणी करुन या चळचळीचे उद्देशही स्पष्ट केले.

भारताचे अलिप्तवादी धोरण हे नेहरु व भारताचे अवास्तविक कल्पनाविलास नसून यथार्थवादी आहे. भारताची भौगोलिक आर्थिक स्थिती जागतीक राजकारणात अहंकारयुक्त स्वार्थपूर्ण निरंकुश राजकारण आणि नवस्वातंत्र्य मिळविलेले अविकसीत देशांची हतबलता या सर्व वास्तव परिस्थितींचा गंभीरपणे सखोल अभ्यास करुन अलिप्ततावाद हे धोरण अवलंबील्या गेले. (संदर्भ १ पान नं. ४५६) भारताला स्वातंत्र्य मिळलेल्या १९४७ च्या काळातच जगात बलाढ्य महासत्तांचा उदय झाला. त्यांनी आपल्या स्वार्थ व हितासाठी नाटो, सेंटो, सियाटो या प्रकारच्या लष्करी करार संघटना निर्माण केल्या तर दुसरीकडे याला प्रत्युत्तर म्हणून साम्यवाद्यांनी वॉर्सा करार संघटना निर्माण केली. या लष्करी गटांमुळे जगाचे विभाजन दोन परस्पर विरोधी शस्त्र सज्ज दोन गटांमध्ये होवून शस्त्रास्त्र स्पर्धेची अंतहीन खेळी सुरु झाली. प्रत्येक महासत्ता आपला प्रभावक्षेत्र वाढविण्याचा सतत प्रयत्न करु लागली यालाच 'शीत युध्द' म्हणतात. भारताचा जन्मजात नापाक घोषीत शत्रु पाकिस्तान अमेरिकेच्या सियाटो करारात सामील झाल्याने हे शीतयुध्द भारताच्या उंबरठ्यावर येवून ठेपले. जगाची विभागणी परस्पर विरोधी गटात झाल्यामुळे तसेच त्यांच्यातील शस्त्रात्र स्पर्धेमुळे जागतीक तसेच भारताची शांती व स्थिरता धोक्यात आली या गंभीर परिस्थितीत सुगम मार्ग म्हणजे अलिप्ततावादी धोरण हे होय. जागतीक शांतता व विकास टिकून राहावा आणि भीषण महायुध्द पुन्हा उद्‌भवू नये हा अलिप्ततावादाचा उद्देश संपूर्ण जग व तेथील जनतेचा अत्यंत हिताचा होता. विकासाची चक्रे संपूर्ण जगात फिरण्याठी जगात शांतता व स्थैर्य तसेच आर्थिक व तंत्रज्ञानाची प्रगत राष्ट्रांची मदत अत्यावश्यक होती. बलाढ्य राष्ट्रांच्या संघर्षापासून अलिप्त राहून आपल्या विकासासाठी दोन्ही बलाढ्य गटांकडून आवश्यक ती मदत घेवून आपल्या देशाचा विकास साधवा व जनतेच्या समस्येचे निराकरण करुन स्वातंत्र्य व आपली संस्कृती अबधीत ठेवावी हे भारताचे सतत प्रयत्न होते.

अलिप्ततावादी धोरण भारताला अनेक अर्थाने उपयुक्त ठरले. या धोरणामुळे परस्परविरोधी महासत्ता तसेच जगातील प्रमुख देशांशी भारताचे मैत्रीपुर्ण सलोख्याचे संबंध प्रस्थापीत झाले. तसेच दोन्ही महाशक्तिंच्या प्रभावापासून मुक्त राहून भारताने आपली स्वतंत्र्य विदेश नीती अवलंबून आपले स्वातंत्र व संस्कृती आजपर्यंत कायम ठेवून आपला विकास साधला व त्यामुळे जागतीक राजकारणात भारताला निर्विवाद मानाचे स्थान प्राप्त झाले.

**भारताच्या अलिप्ततावादाची कसोटी :**

प्रारंभीच्या काळात या चळवळीचा जोमाने प्रसार झाला अनेक आफ्रिकी व अशियायी देश याचे सदस्य बनले. परंतु १९६२ मध्ये पंचशील कराराला तडा देवून हिंदी–चिनी भाई भाई याच्याशी विश्वासघात करुन भारतावर चीनने आक्रमण केले. त्यावेळी भारत अलिप्ततावादी धोरणामुळे आपला बचाव करु शकला नाही अशी टिका भारतावर होवू लागला व भारताने या संघटनेला तिलांजली द्यावी असे टिकाकारांचे टोमणे होते. परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासूंना चिनचे आक्रमण म्हणजे एक आघातात्मक घटना होती, स्व. पंडीत जवाहरलाल नेहरु संसदेत म्हणाले 'आम्ही स्वत:च निर्माण केलेल्या स्वप्नील वातावरणात वावरत होतो, आता आमचे डोळे उघडले आहेत'. आमची शक्ती चीनच्या पुढे कमी पडली भारताने आपल्या मदतीसाठी सर्व बलाढ्य देशाला बोलले व अमेरिका ब्रिटनने त्वरीत मदतही पाठविली. सोव्हियत संघाने त्यावेळी प्रत्यक्ष मदत केली नाही व कोणाचीही बाजूपण घेतली नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी भारतास त्यावेळी मदत केली व भारताच्या अलिप्ततावादी धोरणाची मुक्तकंठानी प्रशंसा केली. चिनी आक्रमणानंतर बड्या राष्ट्रांची मदत घेवूनही भारत बड्या राष्ट्रांच्या आहारी गेला नाही. त्यांची मदत घेताना कोणत्याही अटी मान्य केल्या नाहीत व आपल्या भूमीवर परकीय सैन्यास तळ स्थापन करु दिले नाही.

**अलिप्ततावादाचे मुल्यमापन :**

टिकाकारांच्या मते अलिप्ततेचे धोरण म्हणजे तारेच्या कुंपणावर बसण्यासारखे आहे. सुरक्षा मंडळाने आक्रमक राष्ट्रांविरुध्द केलेल्या कारवाईत अलिप्तता हा एक अडथळा आहे. अशी पण टिकाकार टिका करतात. पण हे खरे नाही, अलिप्त राष्ट्रे संयुक्त राष्ट्रांवर व सामुहिक सुरक्षिततेच्या कल्पनेवरही पूर्ण विश्वास ठेवणारी आहेत. महासभेने अलिप्त राष्ट्रांच्या ठरावानूसार अण्वस्त्र निर्मितीवर बंदी घातली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक शांतता स्थापनेच्या व आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्याच्या कार्यास अलिप्त राष्ट्रांनी बहूमुल्य सहकार्य दिले आहे. (संदर्भ ३ पानं १३५) अलिप्ततेने मानवास उग्र विचारधारा, समाजवाद, भांडवलवाद या संकुचीत कल्पनांपासून दूर नेऊन जागतिक कल्याणाचा उपयुक्त मार्गाचा स्विकार करण्यास प्रवृत्त केले. जो पर्यंत जगात शोषण भष्मासुरी विस्तारवाद, युध्द, आर्थिक विषमता वाढती लोकसंख्या, प्रदुषण, महामारी आणि climate change च्या समस्या आहेत तोपर्यंत अलिप्ततावादी चळवळीची जगाला आवश्यकता आहे.

**कालबाह्य होत चाललेली अलिप्ततावादी चळवळ :**

अलिप्ततावादी चळवळ निर्मीतीस व वाढण्यास दुसरे महायुध्द व शीतयुध्दाचे राजकारण कारणीभुत होते. शीतयुध्दाच्या राजकारणमुळे तिसऱ्या जगातील राष्ट्रांना एकत्र येण्याची संधी प्राप्त झाली आणि आपल्या वाजवी अधिकारासाठी सामुहिकपणे प्रयत्न करु शकले. १९९० मध्ये सोव्हियत रशियाच्या विघटनाबरोबरच शीतयुध्दाचे राजकारण संपुष्टात आले आणि अलिप्तवादी चळवळ कालबाह्य ठरली.

**सारांश :**

दुसऱ्या महायुध्दानंतर दोन विभागात विभाजीत जगात चाललेल्या शीतयुध्दात नवस्वतंत्र्य आफ्रिकी व आशियायी देशांची अलिप्ततावादी चळवळ खुप विकसीत झाली. या चळवळीने जगातील समस्या सोडविण्यासाठी मोलाचे कार्य केले पण रशियाच्या विघटणानंतर शीत युध्द संपुष्टात आले आणि त्यामुळे अलिप्ततावादी चळवळीचे औचित्य संपुष्टात आहे. सोव्हियत रशियाशी विलग झालेल्या स्वतंत्र्य देशांना (रुस सोडून) व त्यांच्या शेजारी देशांना नाटो संघटनेचे सदस्य बनविण्याचा दुश्चक्र सुरु झाले. यामुळे रुस ला

कमकुवत करण्याचा सापळा रचण्याचा षडयंत्र आहे हे रुसला खात्री झाली. स्वत:च्या स्वातंत्र्याचे व महाशक्तिचे पद टिकविण्यासाठी रुसनी आक्रमक पवित्रा घेतला व युक्रेनवर आक्रमण केले व सुमारे दोन महिण्यापासून हे भीषण युध्द व रक्तपात सुरु आहे आणि यामुळे जागतिक शांतता भंग पावली व जगावर महायुध्दाचे सावट पसरले आहे.

भारताने आपल्या अलिप्ततावादाचा अवलंब करुन कोणत्याही पक्षाचा समर्थन केले नाही, युध्द थांबविण्यासाठी पुतीन व युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झोलेंस्की यांना विनंती केली. युक्रेन मध्ये वैद्यकीय शिक्षण घेणारे हजारो विद्यार्थी युध्दरत युक्रेनमध्ये अडकलेले असतांना भारताने युक्रेन व रुसला विनंती केली की युध्दरत भागातून विद्यार्थ्यांना मायदेशी परतण्यास मदत करावी. निपक्षपाती अलिप्ततावादी भारताची विनंती युध्दरत दोन्ही देशांनी मान्य केली व भारताचे वैद्यकीय विद्यार्थी काही अपवाद वगळता सुखरुप मायदेशी परतले. हे सगळे भारताच्या अलिप्ततावादी धोरणामुळे शक्य झाले.

**संदर्भ :**


- आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद – २०१०.
- आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण – प्रा. रघुनंदन वराडकरए विदया प्रकाशन, नागपूर – २००१.
- आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ. वसंत रायपूरकर, रवि ऑफसेट, नागपूर – २००६.